# अभ्यास मंडळावर चिद्रावार यांची निवड

देगलूर : येथील तरूण उद्योजक गुरुराज शशिकांतराव चिद्रावार यांची नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या 'न्यू मॉडेल डिग्री कॉलेज' हिंगोलीमधील राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या सदस्यपदी नामनिर्देशन करण्यात आले आहे. सदरील निवड ही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रकाश महानवर यांनी केली आहे. या निवडीबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सूर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलासशेठ तोटावार, कार्यकारणी सदस्य राजू महाजन, देवेंद्र मोतेवार, गंगाधरराव जोशी, डॉ. कर्मवीर उन्नग्रतवार, रवींद्र अप्पा द्याडे, जनार्दन चिद्रावार, चंद्रकांत नारलावार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner